## ऋणनिर्देश

साने गुरुजी यांच्या कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास ('रामाचा शेला' व 'क्रांति' च्या आधारे) हा विषय एम्.फिल्. च्या शोध-प्रबंधासाठी निवडण्यामागे मा.प्रा.डॉ.विश्वनाथ शिंदे, मराठी विभाग प्रमुख (शिवाजी विद्यापीठ) तसेच मार्गदर्शिका प्रा.डॉ.सौ. शुभांगी शशिकांत भुतकर यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन मार्गदर्शन मिळाले व हा विषय निश्चित केला.

शालेय जीवनात अनेक पुस्तकांबरोबर साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक माझ्या वाचनात आले आणि माझे मन हेलाबून गेले. त्यामुळे त्यांचे इतर साहित्य वाचण्याची प्रेरणा मिळाली. त्यांच्या साहित्यात संस्कार करण्याचे जबरदस्त सामर्थ्य आहे. त्यांच्या साहित्यातील पात्रे विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेली दिसून येतात. या सर्वच पात्रांना दुर्बल घटकांबद्दल प्रेम, अन्यायाची चीड, पीडितांबद्दल कणव, स्त्रियांबद्दल सहानुभूती असल्यामुळे त्यांच्या वाङ्मयाचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला आणि कधीतरी त्यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करण्याची संधी मिळावी असे मनापासून वाटू लागले. आता संशोधनाच्या रुपातून ती संधी मला लाभली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत माझे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले. आता एम्.फिल्. साठीही याच संस्थेतील छ.शिवाजी कॉलेजच्या गुरु डॉ.सौ.शुभांगी शशिकांत भुतकर यांनी मला बहुमोल मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी सदैव त्यांची ऋणी राहीन.

शोध-निबंधाचा अभ्यास करताना माझी बहीण कु. छाया जगताप यांची मला बहुमोल मदत मिळाली. सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजचे ग्रंथालय, तेथील सेवक वर्ग, श्री.पोरे सर व कार्यालयीन सेवक वर्ग यांची सतत मदत मिळाली.

प्रा.डॉ.सौ. नलिनी महाडीक, प्रा.डॉ.सौ.हेमलता गायकवाड व प्रा.यशवंत पाटणे यांचे मला वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले तसेच प्राचार्य डी.बी.पाटील यांनीही मला पत्राद्वारे मार्गदर्शन केले. या सर्वांचे ऋण न फिटण्यासारखे आहेत.

मी शिक्षण घेत असताना सतत मला प्रोत्साहन देणारी माझी आई, माझ्या बहिणी व माझा भाऊ यांच्या ऋणातच राहणे मी पसंत करेन. कारण यांच्या सहकार्याशिवाय संशोधन करणे शक्य झाले नसते.

प्राचार्य के.एस्. मोहिते, प्रा.एम्.एस्. शिंदे, प्रा.डॉ.सौ. विमल पाटील, श्री.प्रमोद कोपर्डे, सौ. सुमन निकम, प्रा.संभाजी मगर, प्रा.एस.जी. मेनकुदळे यांचे मार्गदर्शन मिळाल्याने या सर्वांचा मी आभारी आहे.

या प्रबंधाचे अत्यंत तत्परतेने टंकलेखन व बांधणी करुन देणारे श्री. अनिल कदम आणि त्यांचे सहकारी यांचीही मी आभारी आहे.